# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**काखे (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) येथील जिल्हापरिषदेच्या शाळेमध्ये पाचवीचा अनधिकृत वर्ग सुरू केल्याबाबत**

**(१) २१८३४ (०६-०८-२०१५). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) काखे (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) या गावामध्ये शिक्षण विभागाच्या नियमानुसार, जिल्हा परिषदेच्या शाळांना पाचवीचा वर्ग जोडला जात नसतानाही एका खाजगी शिक्षण संस्थेच्या अनुदानित शाळेत पाचवीचा वर्ग सुरू आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुख्य कार्यकारी अधिकारी, कोल्हापूर यांनी जिल्हा परिषद शाळेचा पाचवीचा वर्ग बंद करण्याविषयी लेखी सूचना दिल्या असतानाही सदर पाचवीचे वर्ग अजूनही सुरू असल्यामुळे गावातील खाजगी माध्यमिक शाळेच्या पाचवीच्या पटसंख्येवर परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा परिषद शाळेचा पाचवीचा वर्ग तातडीने बंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२७-११-२०१७) :**(१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,कोल्हापूर यांनी इयत्ता ५ वीचा वर्ग बंद करणेबाबत दि. २०.०३.२०१५ च्या पत्रान्वये आदेश दिले असून जून, २०१५ पासून इ ५ वी चा वर्ग बंद करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थां कडील प्राथमिक शाळांना वर्गखोल्या बांधण्यासाठी सर्वशिक्षा अभियानातुन निधी उपलब्ध करुन देणेबाबत**

**(२) ३३९०५ (२१-०१-२०१६). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थां कडील प्राथमिक शाळांना इमारतीच्या वर्गखोल्या बांधण्यासाठी सर्वशिक्षा अभियानातुन सन २०१३ पर्यंत निधी उपलब्ध करुन दिला जात होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील जिल्हा परिषदेच्या अंतर्गत असलेल्या अनेक शाळांच्या वर्गखोल्या मोडकळीस आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास या नविन वर्गखोल्यांच्या बांधकामासाठी शासनाकडून कुठलाही निधी उपलब्ध करुन दिला जात नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील जिल्हा परिषद अंतर्गत असलेल्या शाळांना नविन वर्गखोल्याच्या बांधकामासाठी निधी उपलब्ध करुन देणे याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काये आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२३-११-२०१७) :**(१) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळांना वर्गखोली बांधकामासाठी सर्व शिक्षा अभियान अंतर्गत निधी उपलब्ध करून देण्यात येतो.

(२) अंशत: खरे आहे.

(३) नाही.

(४) जिल्हा परिषद शाळांच्या नवीन वर्गखोली बांधकामासाठी सर्व शिक्षा अभियान अंतर्गत तसेच जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत निधी उपलब्ध करण्यात येतो.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**देऊळगाव राजा (जि.बुलढाणा) तालुक्यात सातत्याने निर्माण होणारा वीजेचा प्रश्न सोडविण्याबाबत**

**(३) ३४२८२ (२३-१२-२०१५). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देऊळगाव राजा (जि.बुलढाणा) तालुक्यात सातत्याने निर्माण होणारा वीजेचा प्रश्न सोडविण्यासाठी शहरातील अंभोरा परिसरात १३२ केव्ही. सबस्टेशनला मंजूरी देऊन सन २००९ मध्ये प्रत्यक्षात कामाला सुरवात झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दुसरबीड ते अंभोरा शिवारापर्यंत एकूण १०० मनोरे उभे करण्याचा कामात समोवश असून सदर काम सन २००९ मध्ये सुरु होऊन सहा वर्षाचा कालावधी लोटला तरी १०० पैकी केवळ १४ मनोरे उभे करण्यात आल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, १३२ केव्ही सबस्टेशनचे काम मंदगतीने करण्यामागची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उर्वरित ८६ मनोऱ्याचे काम कधीपर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२४-११-२०१७) :**(१) व (२) सदर १३२ के.व्ही. देऊळगाव राजा उपकेंद्र व संलग्न वाहिनीचे (१३२ के.व्ही. दुसरबीड-देऊळगाव राजा) काम पूर्ण होऊन उपकेंद्र दि.२४.०३.२०१७ रोजी कार्यान्वित झाले आहे.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांना सुरक्षिततेच्यादृष्टीने संरक्षण भिंत बांधण्याबाबत**

**(४) ४३७३३ (२९-०४-२०१६). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील जिल्हा परिषदेच्या सुमारे दीड हजार शाळांना सुरक्षिततेच्यादृष्टीने संरक्षण भिंत नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीनुसार सदर सुरक्षिततेच्यादृष्टीने सदर शाळांना संरक्षण भिंती बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२३-११-२०१७) :**(१) हे खरे आहे.
(२) यु-डायस डाटानुसार राज्यात जिल्हा परिषदेच्या एकूण ६२१९४ शाळा आहेत. यापैकी ४८०९६ शाळांना संरक्षण भिंत उपलब्ध असून १४०९८ शाळांना संरक्षक भिंत नाही.
(३) सर्व शिक्षा अभियान अंतर्गत वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रक शाळांकरिता संरक्षण भिंत बांधकामे भारत सरकारकडे प्रस्तावित केली होती. तथापि भारत सरकारने मान्यता दिलेली नाही. स्थानिक स्तरावर शाळेच्या आवश्यतेनुसार, १४ वा वित्त आयोगाने दिलेला निधी, जिल्हा नियोजन समिती, खासदार निधी, आमदार निधी इ. मधून करता येतो. तसेच संरक्षक भिंत नसल्यास तारेचे अथवा काटेरी वनस्पतींचे कुंपण घालण्याबाबत आदेश देण्यात आले आहेत. त्यानुसार कार्यवाही करता येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्हयातील जिल्हा परिषदेमार्फत सुरु असलेल्या शाळांमध्ये नवीन वर्ग खोल्यांचे व जीर्ण झालेल्या इमारतींच्या बांधकामाबाबत**

**(५) ४५२११ (१६-०५-२०१६). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हा परिषदेमार्फत जिल्हयात १ हजार ५७२ प्राथमिक शाळा, २१ माध्यमिक शाळा व ३ जिल्हा परिषद उच्च माध्यमिक शाळा सुरु असून यात ६ हजार ५२० वर्ग खोल्या असून आणखी ३५० नवीन वर्ग खोल्यांची आवश्यकता आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वर्ग खोल्या कमी असल्यामुळे विद्यार्थ्यांना दोन वर्गाचे विद्यार्थी मिळून किंवा शाळा परिसरातील झाडाखाली, वऱ्हाड्यांत बसून शिक्षण घ्यावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने चंद्रपूर जिल्हयातील जिल्हा परिषदेमार्फत सुरु असलेल्या शाळांमध्ये नवीन वर्ग खोल्यांचे बांधकाम करण्यासंदर्भात व जीर्ण झालेल्या इमारतींचे पुनर्बांधणी करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाचे कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२३-११-२०१७) :**(१) अंशत: खरे आहे.

चंद्रपूर जिल्हा परिषदे अंतर्गत १५६८ प्राथमिक शाळा, २१ माध्यमिक शाळा व ३ उच्च माध्यमिक शाळा सुरु आहेत. यात ६१६४ वर्गखोल्या असून आणखी ३१० वर्गखोल्यांची आवश्यकता आहे.

(२) अंशत: खरे आहे.

प्राथमिक शाळांच्या १७६ वर्गखोल्या जीर्ण झाल्याने तेथील विद्यार्थ्यांना दोन वर्ग मिळून एका वर्गखोलीत शिक्षण देण्यात येत आहे. परंतू झाडाखाली, वऱ्हांडयात शिक्षण देण्यात येत नाही.

(३) व (४) चंद्रपूर जिल्हयातील जिल्हा परिषदेच्या ज्या प्राथमिक व माध्यमिक शाळांच्या इमारती जीर्ण झाल्या आहेत त्या वर्गखोल्या निर्लेखित करण्याबाबत अनुषांगिक कार्यवाही सुरु आहे. सदर वर्गखोल्याची बांधकामे निधी उपलब्धतेनुसार टप्प्याटप्प्याने पूर्ण करण्याचे योजिले आहे

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला जिल्हा परिषदेच्या कॅफो व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मनमानी कारभाराबाबत**

**(६) ४७७०६ (१२-०५-२०१६). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील माध्यमिक शिक्षकांच्या वैद्यकीय देयकाचे २ लाख रुपयांचे मंजुरीचे अधिकार जिल्हा परिषदेच्या सीईओ ना प्रदान करण्याचा नवीन अध्यादेश सन २०१५ मध्ये राज्य शासनाने काढला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सीईओ यांनी सदर देयकांची फाईल कॅफो च्या माध्यमातून पाठविण्याचे आदेश दिले असताना कॅफो सदर फाईल सीईओकडे पाठविण्यास नकार देत आहे, हे खरे आहे काय ?
(३) असल्यास, त्यामुळे अकोला जिल्हयातील पातूर तालुक्यातील काही माध्यमिक शिक्षकांच्या वैद्यकीय देयपूर्तीच्या देयकांच्या फाईल कॅफो व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मनमानी कारभारामुळे निकाली काढण्यात आले नसल्याचे दिनांक ११ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास शासनास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाच्या अध्यादेशाची अंमलबजावणी न करणाऱ्या सदर अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२२-११-२०१७) :**(१) होय.
(२) नाही.
(३) नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही
(५) प्रश्न उद्‌भवत नाही

---

## अहमदनगर जिल्हा परिषदेच्या शाळांतील संरक्षक भिंतीचे बांधकाम निधी अभावी प्रलंबित असल्याबाबत

**(७) ४८५५२ (०६-०५-२०१६). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर जिल्हा परिषदेच्या शाळा व शाळेत शिकणाऱ्या मुलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्वाच्या असणाऱ्या ८०० शाळांतील संरक्षक भिंतीचे बांधकाम निधी अभावी प्रलंबित असल्याचे दिनांक २० डिसेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित संरक्षक भिंत बांधण्यासाठी १८ कोटी रुपये रक्कमेची मागणी केली असली तरी अद्यापपर्यंत मिळाली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, निधी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२३-११-२०१७) :**(१) व (२) अंशत: खरे आहे.
(३) सर्व शिक्षा अभियान अंतर्गत वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रक शाळांकरिता संरक्षण भिंत बांधकामे भारत सरकारकडे प्रस्तावित केली होती. तथापि भारत सरकारने मान्यता दिलेली

नाही. स्थानिक स्तरावर शाळेच्या आवश्यतेनुसार १४ वे वित्त आयोग, जिल्हा नियोजन समिती, खासदार निधी, आमदार निधी इ. मधून करता येतो. तसेच संरक्षक भिंत नसल्यास तारेचे अथवा काटेरी वनस्पतींचे कुंपण घालण्याबाबत आदेश देण्यात आले आहेत. त्यानुसार कार्यवाही करता येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पालघर जिल्हयात जिल्हा परिषद शाळा बंद पडत असल्याबाबत

**(८) ४८९०९ (१६-०५-२०१६). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयामधील जिल्हा परिषद शाळांचा प्राथमिक शिक्षणाचा दर्जा कमालीचा घसरलेला असून सन २०१४-१५ या एका वर्षात १४ शाळा बंद पडल्याचे दिनांक २१ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कोणती उपाययोजना अंमलात आणली वा आणण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२१-११-२०१७) :**(१) हे अंशत: खरे आहे. पालघर जिल्हयातील पटसंख्येअभावी पाच जिल्हा परिषद शाळा बंद पडलेल्या आहेत.

(२) होय.

(३) दि. १५ जून, २०१६ पासून सदर शाळा ज्या भागातील आहेत तेथील पर्यवेक्षण यंत्रणेला सूचित करण्यात आले आहे की, शाळेत दाखलपात्र मुले जर दाखल झाली तर ती शाळा त्वरीत सुरु करावी.

तसेच प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमांतर्गत पालघर जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये ज्ञानरचनावादी पध्दतीने शिक्षण देण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### धाड (ता.जि.बुलढाणा) येथील उर्दू माध्यमिक शाळेच्या समस्याबाबत

**(९) ४९३२३ (१२-०५-२०१६). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा तालुक्यातील धाड येथील उर्दू माध्यमिक शाळेच्या समस्या जिल्हा परिषद बुलढाणा यांना ग्रामस्थांनी वारंवार निवेदन देवूनही समस्या सोडविल्या नसल्याने येथील सरपंच ग्रामस्थांनी टॉवरवर चढून आंदोलन केले असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील उर्दू शाळेच्या समस्या सोडविण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२३-११-२०१७) :**(१) खरे आहे.
(२) उर्दू माध्यमिक शाळा धाड येथील विद्यार्थ्यांच्या समस्यांबाबत व ग्रामस्थांनी दिलेल्या निवेदनानुसार पिण्याच्या पाण्याची व्यवस्था (उर्दू व मराठी माध्यम वेगळे करणेबाबत) प्रयोगशाळा उपलब्ध केली आहे व १५० डेस्क बेंचची व्यवस्था करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात शालेय शिक्षणाच्या ढासळलेल्या गुणवत्तेबाबत**

**(१०) ५६२६१ (२२-०८-२०१६). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.महेश (दादा) लांडगे (भोसरी), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शालेय शिक्षणाची गुणवत्ता ढासळली असून, दर्जाही घसरलेला असल्याचे शिक्षण विकास निर्देशांकांत पूर्वेकडील राज्यापेक्षाही महाराष्ट्र राज्याची अधोगती झालेली असल्याचे यूईई अहवालाद्वारे शासनाच्या निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. विनोद तावडे (२१-११-२०१७) :**(१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राजीव गांधी विदयार्थी अपघात सानुग्रह अनुदान योजनेअंतर्गत अनुदान उपलब्ध होत नसलेबाबत**

**(११) ५८५०८ (२२-०८-२०१६). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात राजीव गांधी विदयार्थी अपघात सानुग्रह अनुदान योजनेअंतर्गत इयत्ता १ ली ते १२ वी पर्यंत शिकणा-या मुला/मुलींना अपघातामुळे झालेल्या क्षतीची नुकसान भरपाई देण्याची योजना सन २०१२-२०१३ पासून राबविण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेअंतर्गत शिक्षणाधिकारी (माध्य) जिल्हा परिषद, नाशिक यांचे अधिपत्याखालील इयत्ता ९ ते १२ वी पर्यंत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना सानुग्रह अनुदान मिळणेसाठीचे ३८ प्रस्ताव दिनांक ९ ऑक्टोबर, २०१५ रोजी शासनाकडे दाखल केले असून अदयाप अनुदान उपलब्ध झालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अनुदान उपलब्ध होण्याचे दृष्टीने शासनाने काय उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२१-११-२०१७) :**(१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील तबेल्यासह ब्रॅण्डच्या दुधामध्ये प्रमाणापेक्षा अधिक पाणी असल्याचे निदर्शनास आल्याबाब

**(१२) ६७९२४ (२७-०१-२०१७). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील तबेल्यासह ब्रॅण्डच्या दुधाचे अन्न व औषध प्रशासन विभागाने घेतलेल्या १३२ नमुन्यां पैकी ५५ नमुन्यांमध्ये प्रमाणापेक्षा अधिक पाणी असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईमध्ये मोठया प्रमाणात निकृष्ट दर्जाचे दुध विक्री करीत असलेल्या सदर दूध विक्रेत्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२७-११-२०१७) :**(१) व (२) अन्न व औषध प्रशानाद्वारे सन २०१५-१६ या कालवधीत मुंबई शहरातून १३२ दूधाचे नमुने भेसळयुक्त / कमी दर्जाचे असल्याच्या संशयावरुन विश्लेषणासाठी घेण्यात आले. त्यापैकी विश्लेषणाअंती ७७ नमुने प्रमाणित, २१ नमुने कमी दर्जाचे व ३४ नमुने असुरक्षित आढळून आले.

कमी दर्जाच्या २१ प्रकरणांपैकी १५ प्रकरणे न्यायनिर्णय खटले व ६ तडजोड प्रकरणे दाखल करण्यात आले आहेत. १५ पैकी ७ न्यायनिर्णय प्रकरणी रु.२,९३,०००/- व ६ तडजोड प्रकरणी रु ७५,०००/- दंड आकारण्यात आला आहे. उर्वरीत ८ न्यायनिर्णय प्रकरणी सुनावणी सुरु आहे.

३४ नमुन्यांपैकी २९ प्रकरणांमध्ये फौजदारी खटले दाखल करण्यात आले असून ५ प्रकरणी तडजोड अर्ज दाखल करण्यात आले असून सदर प्रकरणी सुनावणी सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर येथील जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागातील गैरकारभाराबाबत**

**(१३) ६८४५८ (०६-०१-२०१७). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथील जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागातील गैरकारभारामुळे ईबीसी सवलतीचे धनादेश पडून असल्याचे नुकतेच माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर धनादेश पडून राहण्यासाठी कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदरहू धनादेश तात्काळ शाळांना वितरीत करण्याबाबत व त्यास जबाबदार असणाऱ्या व्यक्तींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१६-११-२०१७) :**(१) नाही.

(२) कोल्हापूर येथील जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागातील श्री. चंद्रकांत सावर्डेकर, व सहा. यांचेकडे कोल्हापूर (शहर), गडहिंग्लज, चंदगड तालुक्यातील संपूर्ण कामकाज, शाळांना शिष्यवृत्ती वितरीत करणे व संकीर्ण कार्यभार देण्यात आलेला होता. सदर लिपीकास लाच मागणी प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक पथकाने पकडल्याने दि. १३/११/२०१६ पासून जिल्हा परिषद सेवेतून निलंबीत करण्यात आले आहे.

श्री.चंद्रकांत सावर्डेकर यांना निलंबीत केलेनंतर त्यांच्या कार्यासनातील दप्तराची तपासणी झाली असता, सन २०१४-१५ मधील शिष्यवृत्तीचे धनादेश संबंधित शाळांना वितरीत केले नसलेचे निदर्शनास आले.

(३) व (४) सदर प्रलंबित धनादेश तात्काळ माहे डिसेंबर, २०१६ व जानेवारी, २०१७ मध्ये संबंधित शाळांना वितरीत करण्यात आलेले आहेत. तसेच मुदतबाह्य झालेले धनादेश संबंधित शाळांना मुदतवाढीच्या पत्रासह वितरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**अमरावती (जि.अमरावती) शहरातील मनभरी उत्पादनाच्या चिवडयात पाल सापडल्याबाबत**

**(१४) ७०३१० (१६-१२-२०१६). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती (जि.अमरावती) शहरातील विजय नगर येथील श्रीमती विमल चुडे या महिलेने देशपांडे वाडीतील गणेश डेअरी या दुकानातून माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान खरेदी केलेल्या मनभरी चिवड्याचे सिलबंद पाकीटामध्ये संपूर्ण तळलेली पाल आढळली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार सदर चिवडा उत्पादकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२७-११-२०१७) :**(१) दि. २२-०९/२०१६ रोजीच्या लोकमत वृत्तपत्रात अशा आशयाची बाब प्रसिध्द झाली होती. परंतू अन्न व औषध प्रशासनास याबाबत कुठलीही लेखी/ तोंडी तक्रार प्राप्त झालेली नाही.

(२) सदर बातमीच्या अनुषंगाने प्रशासनाने दि. २२/०९/२०१६ रोजी मे. गणेश दुध डेअरी, अमरावती या विक्रेत्याकडे चौकशी करून त्याने सादर केलेल्या बिलावरून सदर मनभरी चिवड्याचे उत्पादक मे. ओमजी नमकीन प्रा.लि., दाभा, ता.नांदगाव खांडेश्वर, जि.अमरावती या पेढीची दि. २२/०९/२०१६ रोजी तपासणी करण्यात आली. तपासणी अंती सदर पेढीत उत्पादित केले जाणारे १) मनभरी नमकीन तिखामिठा, २) मनभरी नमकीन व्हाईट साबुदाणा या दोन अन्न पदार्थाचे नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले. विश्लेषणाअंती सदर नमुने प्रमाणित घोषित झाले आहेत. तथापि मे. ओमजी नमकीन प्रा.लि. या पेढीच्या तपासणीदरम्यान आढळून आलेल्या त्रुटींच्या अनुषंगे पेढीविरूध्द न्यायनिर्णय खटला क्र. २९/२०१६ दि.०७/११/२०१६ रोजी दाखल करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईसह राज्यात होणाऱ्या ध्वनी प्रदूषणावर प्रतिबंध घालण्याबाबत

**(१५) ७११९८ (१६-१२-२०१६). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील सण - उत्सवादरम्यानची आवाजाची मर्यादा मोजण्यासाठी मा.न्यायालयाने १८४३ डेसिबल मीटर्स उपलब्ध करण्याचे निर्देश खंडपीठाने या पूर्वी राज्य शासनाला दिले असल्याचे दिनांक १३ऑगस्ट,२०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यावेळी शांतता क्षेत्रात हॉर्नचा वापर तसेच फटाके वाजण्यास बंदी असलीच पाहिजे, ध्वनी प्रदुषण विषयक नियमावलीचे उल्लंघन होत असल्याची तक्रार आल्यास ती तातडीने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि जिल्हाधिकाऱ्याकडे पाठविण्याचे निर्देश ही खंडपीठाने शासनाला दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईसह राज्यात बांधकाम आवाजाला व मुंबईत मोठ्या प्रमाणात होणारे ध्वनी प्रदुषणावर प्रतिबंध घालण्यासाठी शासनाने कोणती उपायोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (१८-११-२०१७)** :(१) व (२) हे खरे आहे.

(३) अ) केंद्र शासनामार्फत निर्गमित ध्वनी प्रदूषण (नियंत्रण व नियमन) नियम, २००० ची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी प्राधिकरणाची म्हणून शहरामध्ये पोलिस उप आयुक्त व इतर ठिकाणी जिल्हा पोलीस अधिक्षक यांची एक सदस्य प्राधिकरण म्हणून पर्यावरण विभागाच्या दिनांक २८ जुलै,२०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार नियुक्ती करण्यात आली आहे.

ब) उदयोगांमधून निर्माण होणाऱ्या ध्वनी प्रदूषणाबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून कार्यवाही करण्यात येते.

क) पर्यावरण विभागाद्वारे राज्यातील वाहनांमध्ये वापरण्यात येणाऱ्या हॉर्न्स, सायरन्स आणि/किंवा मल्टीटोन हॉर्न्स यासाठीची मानके व त्यांचा वापराबाबत दिनांक ३१ जुलै,२०१४ व दिनांक १७ मे,२०१७ रोजी अधिसूचना निर्गमित केलेली आहे.

ड) नगर विकास विभागामार्फत, इलेव्हेटेड रस्ते, उड्डान पुल व इलेव्हेटेड रेल्वे कॉरिडोअस या प्रकल्पा संदर्भात ध्वनीप्रदूषण कमी करण्यासाठी दिनांक २६/१०/२०१५ रोजी मार्गदर्शक तत्व जारी करण्यात आलेली आहे.

इ) राज्यभर साजरे करण्यात येणाऱ्या विविध सण/उत्सवांदरम्यान महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व पर्यावरण विभागाच्या संयुक्त विद्यमानाने जनजागृतीचे कार्यक्रम आयोजित केले जातात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे विभागाअंतर्गत अन्न व भेसळ प्रतिबंधक कायदयाखाली**
**न्यायालयात प्रलंबित असलेली प्रकरणे**

**(१६) ७१४९७ (१६-१२-२०१६). श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे विभागाअंतर्गत एफ.डी.ए.च्या पाच जिल्हयातील माहे ऑगस्ट, २०१६ अखेरपर्यंत अन्न व भेसळ प्रतिबंधक कायदयाखाली १ हजार १५१ खटले न्यायालयात प्रलंबित असून अन्न व सुरक्षा मानके कायदयाखाली ४७२ खटले दाखल असताना सदर खटल्यांचा निकाल लागल्यानंतर गुन्हा सिध्दतेनंतर शिक्षेचे प्रमाण केवळ ४ ते ५ टक्केच असल्याने भेसळ करणाऱ्या दोषींवर कोणतीच कारवाई होत नसल्याचे दिनांक १७ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२७-११-२०१७)** :(१) अन्न व औषध प्रशासनाच्या ठाणे विभागांतर्गत येणाऱ्या पाच जिल्हयांतील विविध न्यायालयात अन्न भेसळ प्रतिबंधक कायदा १९५४ अंतर्गत एकूण १०८८ तर अन्न सुरक्षा व मानदे कायदा, २००६ अंतर्गत एकूण ४९० एवढे खटले प्रलंबित आहेत.

ऑगस्ट, २०११ ते ऑक्टोबर, २०१६ या कालावधीत सदर दोन्ही कायद्यान्वये न्यायालयात दाखल झालेल्या खटल्यांपैकी २४६ खटले निकाली निघाले आहेत. त्यापैकी ०३ आरोपींना शिक्षा ठोठावण्यात आली असून २४३ जणांची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे.
(२) शिक्षेचे प्रमाण वाढविण्यासाठी न्यायालयात दाखल होणा-या खटल्यांमध्ये शासनाची बाजू भक्कमपणे मांडण्यासाठी अन्न व औषध प्रशासनासाठी स्वंतत्र लीगल सेल स्थापन करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. त्यामुळे प्रशासनातील अधिका-यांना खटल्यांमध्ये शासनाची बाजू मांडताना मदत होऊन शिक्षेचे प्रमाण वाढण्यास मदत होईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील गोरगरीब रुग्णांसाठी औषधांच्या किंमती कमी करून**
**रास्त दरात औषधे उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव**

**(१७) ७३६४९ (१०-०१-२०१७). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील गोरगरीब रुग्णांसाठी औषधांच्या किंमती कमी करून रास्त दरात औषधे उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, सदरहू प्रस्तावाचे थोडक्यात स्वरूप काय आहे;
(३) असल्यास, सदरहू प्रस्तावाची अंमलबजावणी किती कालावधीत होणे अपेक्षित आहे;
(४) नसल्यास, सदर प्रकरणी शासनाची भूमिका काय आहे?

**श्री. गिरीश बापट (१४-११-२०१७) :**(१) असा प्रस्ताव अन्न व औषध प्रशासनाच्या विचाराधीन नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य शासनाने शाळा प्रगत करण्यासाठी प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र योजना सुरु केल्याबाबत**

**(१८) ७७८८० (२०-०४-२०१७). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने शाळा प्रगत करण्यासाठी प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र योजना सुरु केली असून यात केवळ १५ हजार शाळा प्रगत झाल्या असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या

दरम्यान निदर्शनास आले असल्याने उक्त योजना राज्यातील सर्व माध्यमिक व खाजगी शाळांनाही लागू करण्याचा निर्णय माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमाच्या नावाखाली शाळांना भेटी देऊन चुका दाखविण्यासाठी बैठकांच्या नावाखालील उशिरापर्यंत शिक्षकांना शाळांमध्ये थांबवून त्यांना मानसिक त्रास देण्यात येत असल्याबाबत शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांच्या विरोधात माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान शासनाकडे तक्रारी करण्यात आलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच शाळा प्रगत करण्याचे उद्दीष्ट फसल्याने राज्यातील निम्म्या म्हणजे ३३ हजार शाळा प्रगत करण्यासाठी "प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र" ऐवजी आता "जलद प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र" हा कार्यक्रम शालेय शिक्षण विभागाने प्रस्तावीत केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१८-११-२०१७) :**(१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) शासन निर्णय दिनांक ०९ जानेवारी, २०१७ नुसार जलद प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र या कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले असून, यामध्ये राज्यातील प्रत्येक शाळा, वर्ग डिजिटल करणे, १००% शिक्षकांना तंत्र स्नेही (Tech Savvy) करणे, संकल्पनांवर ई-साहित्य तयार करणे, वर्गातील मुलांचे संकल्पना निहाय संपादणूकीच्या विश्लेषणासाठी माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग करणे, गुणवत्ता वाढविणे, सर्व पर्यवेक्षकीय यंत्रणेला नेतृत्व प्रशिक्षण देण्याबाबत, शाळाबाह्य मुलांना शोधून गुणवत्ता वाढवून शाळेत टिकविणे, स्थलांतरीत मुलांचे सरळ प्रणालीमध्ये १००% नोंद करणे, शाळा सिध्दी या पोर्टलवर स्वमूल्यमापन करणे, इत्यादी क्षेत्रात काम करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### वाशिम जिल्हयातील स्वच्छ भारत अभियानांतर्गत फोटो अपलोडींग करण्याबाबत

**(१९) ८२६९३ (२०-०४-२०१७). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्हयात केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत ३७ हजार ७५७ फोटो अपलोड करण्याचे उद्दीष्ट देण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागरिकांना स्वच्छ पर्यावरण व चांगले आरोग्य मिळावे या करीता स्वच्छतेची आणि शौचालयांची सुविधा उपलब्ध् करुन देण्याचे ध्येय गाठण्यासाठी केंद्र शासनाने स्वच्छ भारत अभियान संपूर्ण देशामध्ये राबविण्याची घोषणा केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा परिषदेच्यावतीने नियोजन करण्यात आले होते तरी सुध्दा संबधितांकडून अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही असे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त जिल्हयातील वाशिम-६०, मालेगांव-३१, रिसोड-२५१, मंगरुळपिर-१२६, मानोरा-४५, कारंजा-२७ एकूण ५४ फोटो अपलोड करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व याबाबत शासनाची स्पष्ट भूमिका काय आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२८-११-२०१७) :**(१) वाशिम जिल्हयासाठी मार्च २०१७ पर्यत ७१९३८ फोटो अपलोड करण्याचे उद्दीष्ट देण्यात आले होते.

(२) होय.

(३) व (४) वाशिम जिल्हयात आतापर्यत कारंजा-१५६०४, मानोरा-१०३८५, वाशिम-५९८९, मालेगांव-५१८६, रिसोड-४९५९, मंगरूळपिर-४७३९, याप्रमाणे एकूण ४६८६२ फोटो अपलोड करण्यात आलेले आहेत.

(५) फोटो अपलोडसाठी मोबाईल ॲप मध्ये तांत्रिक अडचणी येत असल्यामुळे फोटो अपलोड करण्यास अडचण येत होती. सद्यस्थितीत वाशिम जिल्हयातील फोटो अपलोडचे उद्दीष्ट ५५.८२% पुर्ण झाले आहे.

वाशिम जिल्हयातील सन २०१६-१७ मध्ये ३८०२७ इतके शौचालय बांधकाम झाले आहे. सन २०१७-१८ या वर्षामध्ये ७१६९६ शौचालय बांधकाम पुर्ण करण्याचे उद्दीष्ट आहे. सन २०१७-१८ या वर्षामध्ये शौचालय बांधकाम व फोटो अपलोडचे काम सोबतच करण्याबाबत नियोजन करण्यात आले असून त्याबाबत कार्यवाही सुरू आहे.

---

## दौंड (जि.पुणे) तालुक्यातील मुळा-मुठा व भीमा या नद्यांमध्ये जलपर्णीची वाढ झाल्याबाबत

**(२०) ८२९०२ (२०-०४-२०१७). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौंड (जि.पुणे) तालुक्यातील काही गावांना बारमाही पाणीपुरवठा करणारी मुळा मुठा व भीमा या नद्यांमध्ये जलपर्णीची वाढ झाली असल्याचे माहे जानेवारी २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त नद्यांमध्ये वाढलेल्या जलपर्णी मुळे डासांची उत्पत्ती होत असून रोगराई पसरली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त नद्यामधील जलपर्णीची उत्पत्ती थांबवण्यासाठी व शुध्दीकरणाकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (१८-११-२०१७) :**(१) पुणे, पिंपरी-चिंचवड व नदीकाठावरील महानगरपालिका, नगरपालिका, गावे या क्षेत्रातील घरगुती सांडपाणी नदीपात्रात मिसळत असल्याने जलपर्णीची वाढ झालेली आहे ही वस्तुस्थिती आहे.
(२) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद पुणे यांच्या दिनांक १६ मार्च,२०१७ रोजीच्या पत्रानुसार कोणत्याही आजाराच्या साथीचा उद्रेक झाला नसल्याचे कळविलेले आहे.
(३) (i) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून दरमहा नदीच्या पाण्याचे पृथ:करण करण्यात येते.

(ii) राष्ट्रीय नदी कृती योजनेंतर्गत पुणे शहरातील मुळा-मुठा नदी संबर्धनाच्या अनुषंगाने सांडपाणी संकलन व प्रक्रिया यासाठी केंद्र शासनामार्फत रु.९९०.२६ कोटी एवढया खर्चाचा प्रस्ताव मंजूर झालेला आहे.

(iii) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने उदयोगांना विनाप्रक्रिया सांडपाण्याचा विसर्ग करण्याबाबत बंदी घातलेली असून उदयोगातून निर्मित होणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करुन प्रक्रियाकृत सांडपाणी बाहेर सोडण्याचे निदेश दिलेले आहेत.

(iv) राज्यातील महानगरपालिका व नगरपालिका यांना सांडपाणी व नागरी घनकचरा व्यवस्थापनाबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(v) राज्यात दिनांक १२ ऑगस्ट,२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये नमामि चंद्रभागा प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मराठी चित्रपट राज्य सरकारच्या अनुदानपासून वंचित असल्याबाबत**

**(२१) ८४९२३ (२१-०८-२०१७). अॅड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागामार्फत सन १९७५ पासून दर्जेदार मराठी चित्रपटांना प्रोत्साहन मिळण्याकरिता अनुदान देण्यात आले असूनही राष्ट्रीय पुरस्कार मिळणाऱ्या मराठी चित्रपट सृष्टीतील ५४ चित्रपटांचे निर्माते सन २०१३ पासून राज्य शासनाच्या अनुदाना पासून वंचित असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२)असल्यास, सन २०१३ पासून अनुदानासाठी निवड झालेल्या चित्रपटांनां देय असलेली रूपये २३ कोटीची रक्कम प्रलंबित असून अखिल भारतीय चित्रपट महामंडळाने सदर अनुदानाची रक्कम मिळण्याकरिता तसेच, अनुदान त्वरीत वितरित करण्याकरिता व तांत्रिक प्रक्रियेत होणारा विलंब टाळण्याकरिता अद्यावत यंत्रणा स्थापन करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, मुंबई गोरेगाव परिसरात असलेल्या शासन मान्य दादासाहेब फाळके महामंडळामार्फत दरवर्षी मराठी चित्रपटांचे परीक्षण करून चित्रपट निर्मात्यांना अनुदान देण्यात

येत असून सन २०१४ ते दिनांक ३१ मे, २०१७ या कालावधीत एकूण किती मराठी चित्रपटांचे परीक्षण करून त्या चित्रपट निर्मात्यांना अनुदान मंजूर करण्यात आले व किती निर्मात्यांना अनुदान देण्यात आले व किती निर्मात्यांचे अनुदान देणे प्रलंबित आहे,
(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशी अंती इंग्रजी व हिंदी चित्रपटांबरोबर स्पर्धेमध्ये पात्र ठरलेल्या मराठी चित्रपट व कलांकाराना आर्थिक अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१८-११-२०१७) :**(१) व (२) हे खरे नाही.
(३) दि.१.०१.२०१४ ते दि.३१.०५.२०१७ या कालावधीत महामंडळामार्फत एकूण २३८ चित्रपटांचे परीक्षण “चित्रपट परीक्षण समिती”कडून करण्यात आले. समितीने परिक्षणाअंती १४१ चित्रपटांना अनुदानासाठी पात्र ठरविले. अनुदानासाठी पात्र ठरलेल्या १४१ चित्रपटांपैकी ११० चित्रपटांना रू.२६,१६,६७,२०० इतके अनुदान वितरीत करण्यात आले आहे. तर ९७ चित्रपट अर्थसहाय्यासाठी अपात्र ठरविले.

यानंतर परिक्षणाअंती पात्र असलेल्या १४ चित्रपटांना निधीच्या उपलब्धतेनुसार अनुदान उपलब्ध करून देण्यात येईल. उर्वरीत १७ चित्रपटांबाबतच्या आवश्यक कागदपत्रांची पुर्तता संबंधित निर्मात्यांकडून करण्यात न आल्यामुळे त्यांचे प्रस्ताव प्रलंबित आहेत.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### धनिवली (ता.मुरबाड, जि.ठाणे) जवळील टेक्नोक्राफ्ट व इतर कंपन्यांचे प्रदुषित पाणी नदीपात्रात सोडले जात असल्याने पिके व भाजीपाला नष्ट होत असल्याबाबत

**(२२) ८५४११ (२१-०८-२०१७). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धनिवली (ता.मुरबाड, जि.ठाणे) जवळील टेक्नोक्राफ्ट व इतर कंपन्यांचे प्रदुषित पाणी नदीपात्रात सोडले जात असल्याने शेतजमीन दर्जाहीन होत असून शेतक-यांची पिके व भाजीपाला नष्ट होत असल्याप्रकरणी परिसरातील गावांच्या सरपंचांनी तहसीलदार,मुरबाड यांचेकडे दिनांक २१ एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास तसेच वारंवार तक्रारी केलेल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधितावंर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (१८-११-२०१७) :**(१) ग्रुपग्रामपंचायत, देवपे यांची मे.टेक्नोक्राफट इंडस्ट्रिज (इंडिया) लि., धानिवली यांनी रसायनयुक्त सांडपाणी सोडल्याने नदीपात्रातील पाणी दुषित झाल्याबाबतची तहसिलदार मुरबाड यांना अग्रेषित तक्रार गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मुरबाड यांच्यामार्फत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास दि. १८.०३.२०१७ रोजी प्राप्त झालेली होती.

(२) संबंधितांवर खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

• महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत सदर उद्योगास दिनांक २०/०३/२०१७, २१/०३/२०१७, २३/०३/२०१७ व २२/०६/२०१७ रोजी स्थळभेट देण्यात आली होती व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने प्रदान केलेल्या संमतीपत्रातील अटी व शर्तींच्या उल्लंघनाच्या अनुषंगाने सदर उद्योगास दिनांक ०३/०४/२०१७ व १९/०४/२०१७ रोजी प्रस्तावित निर्देश देण्यात आले आणि बँक हमी जमा करण्यात आली.

• तसेच दिलेल्या निर्देशाचे अनुपालन न केल्याने दिनांक २६/०७/२०१७ रोजी उद्योगास बंदचे आदेश देण्यात आलेले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पतंजलीच्या आयुर्वेदिक आवळा ज्युसमध्ये त्रुटी आढळल्या असल्याबाबत**

**(२३) ८५५८६ (२१-०८-२०१७). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पतंजलीच्या आयुर्वेदिक आवळा ज्युसमध्ये प्रयोगशाळेतील चाचणीत त्रुटी आढळल्या असल्याची बाब माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लष्कराच्या कॅन्टिन स्टोर्स डिपार्टमेंटने (सीएसडी) पतंजलीच्या संबंधित (त्रुटी आढळलेल्या) बॅचची विक्री थांबवून त्रुटी आढळलेला आवळा ज्युस पतंजलीला परत पाठवला असून पतंजलीला कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात पंतजलीच्या उत्पादनांचा मोठ्याप्रमाणावर वापर होत असतांना आयुर्वेदिक आवळा ज्युसमध्ये त्रुटी आढळल्याची बाब निदर्शनास आल्यानंतर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१४-११-२०१७) :**(१) होय.

दिनांक १७/०७/२०१७ रोजी इंटरनेटवर FIRSTPOST - “Patanjali amla juice faces quality issue, army canteens retail platform suspends sale over FSSAI report” या शिर्षाखाली बातमी प्रसिध्द करण्यात आली असून त्यात पतंजली आयुर्वेदिक या उत्पादकाच्या आवळा ज्यूस या आयुर्वेदिक प्रोपायटरी मेडिसिनचा नमुना कोलकाता येथील अन्न चाचणी प्रयोगशाळेने चाचणी केली असता ते FSSAI च्या मानकाप्रमाणे नसल्याचे अहवालात निदर्शनास आले आहे.

सदर प्रकरण महाराष्ट्र राज्याशी संबधित नाही.
(२) होय, हे अंशत: खरे आहे.
(३) सदर प्रकरण महाराष्ट्र राज्याशी संबधित नसुन सदर नमुन्यांची चाचणी महाराष्ट्र औषध नियंत्रण प्रयोगशाळेने केलेली नाही. त्यामुळे त्यावर कारवाई करता येणार नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हवेली( जि.पुणे) येथील वेंकीज कंपनीचे दुषित सांडपाणी, रसायने, मैला वरदाडे गावातील शेतीमध्ये सोडले जात असल्याबाबत**

**(२४) ८५८८५ (२१-०८-२०१७). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हवेली (जि.पुणे) येथील वेंकीज कंपनीचे रासायनिक प्रकल्पातून उत्सर्जित होणारे सांडपाणी वरदाडे गावातील शेतीमध्ये सोडले जात असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संदर्भात गावचे शेतकरी, ग्रामस्थ वारंवार पाठपुरावा करत असतांना उक्त कंपनी व्यवस्थापनाकडून कोणतीच कार्यवाही होत नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त कंपनीवर तसे संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (१४-११-२०१७) :**(१) नाही.
(२) व (३) मे. व्यंकटेशश्वरा रीसर्च आणि ब्रिडींग फार्म प्रा.लि. यांचा मौजे वरदाडे ता.हवेली, जिल्हा पुणे येथे कुकुटपालन तसेच तद्संबंधीचे संशोधन प्रकल्प कार्यरत आहे.सदर प्रकल्पाला महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिनांक १९.५.२०१७ रोजी संमतीपत्र दिले असून सदर संमतीपत्राची वैधता दिनांक ३१.३.२०२३ पर्यन्त आहे. सदरील प्रकल्पातून औद्योगिक सांडपाण्याची निर्मिती होत नाही. घरगुती सांडपाण्यावरील प्रक्रियेसाठी सेप्टीक टँक व सोकपिट सयंत्रणा उभारली आहे. प्रकल्पामधून निघणारी पक्षांची विष्ठा ही खत म्हणून शेतक-यांना विकण्यात येते. सरपंच, ग्रामपंचायत वरदाडे यांनी सदर प्रकल्प १९८१ पासून ते आजतागायत सुरु असून या कंपनीकडून गेल्या ३७ वर्षात परिसरातील नागरी व शेतक-यांना कोणत्याही प्रकारचा त्रास होत नसल्याबाबत दिनांक २५.७.२०१७ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यशवंतराव चव्हाण मुक्त विद्‌यापीठाच्या बीएस्सी ऑटोमोबाईलच्या शाखेच्या प्रथम वर्षाच्या परिक्षेमध्ये अभ्यासक्रमाबाहेरील प्रश्न दिल्याबाबत**

**(२५) ८५८९७ (२१-०८-२०१७). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यशवंतराव चव्हाण मुक्त विद्‌यापीठाच्या बीएस्सी ऑटोमोबाईल शाखेच्या घेण्यात आलेल्या प्रथम वर्षाच्या परिक्षेमध्ये चार विषयाच्या पेपरमध्ये अभ्यासक्रमाबाहेरील प्रश्न दिल्याचे दिनांक २८ मे,२०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले, व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२३-११-२०१७) :**(१) होय, अंशत: खरे आहे.

मुक्त विद्‌यापीठाच्या बीएस्सी ऑटोमोबाईल शाखेच्या मे, २०१७ मध्ये झालेल्या प्रथम वर्षाच्या बीएस्सी ऑटोमोटीव टेक्निक शाखेच्या मे, २०१७ च्या परीक्षेत फक्त BAM १०२ (Engineering Mechanics) या एकाच विषयाच्या पेपरमध्ये प्रश्न क्र. ३ मधील उपप्रश्न a व d हेच दोन उपप्रश्न अभ्यासक्रमाबाहेरील आहेत.
(२) होय.

प्राप्त चौकशी अहवालानुसार BAM १०२ (Engineering Mechanics) या विषयाच्या पेपरमधील प्रश्न क्र. ३ मधील उपप्रश्न a व d हे दोन उपप्रश्न प्रत्येकी ५ गुणांचे असून संबंधित विद्‌यार्थ्यांना त्याचे गुण देण्यात येत आहेत. त्याचप्रमाणे संबंधित प्रश्नपत्रिका तयार करणाऱ्या विषयतज्ज्ञावर विद्‌यापीठ परीक्षा मंडळामार्फत कार्यवाही करण्यात येणार आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्याचे वेतन व निवृत्ती वेतनाचे दायित्व राज्य शासनाने स्विकारण्याबाबत**

**(२६) ८६४३५ (२१-०८-२०१७). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्याचे वेतन व निवृत्ती वेतनाचे दायित्व राज्य शासनाने स्विकारावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्री यांच्याकडे निवेदनाद्‌वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा खर्च त्यांना मिळणाऱ्या १७.५ टक्के ई. टी. पी. मधून भागविण्यात येत होता, तथापि, पाणी पुरवठा व्यवस्थापन व नियोजन व कार्यान्वय

स्थानिक संस्थांकडे हस्तांतरीत करण्यात आल्याने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या उत्पन्नाचे स्त्रोत अतिशय कमी झाले असल्याने आस्थापनाचा खर्च भागविणे कठिण होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्याचे वेतन व निवृत्ती वेतन शासनामार्फत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आह,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१६-११-२०१७) :**(१) होय.
(२) होय.
(३) मंत्री मंडळाने घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग दिनांक २३.३.२०१७ अन्वये दिनांक २३.३.२०१७ पासून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधिकारी/कर्मचारी यांच्या नियमित वेतन व भत्त्यांचे, तसेच सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचा-यांच्या निवृत्तीवेतनाचे दायित्व राज्य शासनाने स्वीकारले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील शाळेत भाषा, कला आणि शारीरिक शिक्षण या विषयांच्या अभ्यासात कपात करण्याचा शासनाने घेतलेला निर्णय**

**(२७) ८६७७३ (२३-०८-२०१७). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शाळेत भाषा, कला आणि शारीरिक शिक्षण या विषयांच्या अभ्यासात कपात करण्याचा निर्णय शिक्षण विभागाकडून घेण्यात आला असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिक्षण विभागाच्या या निर्णयाविरोधात शिक्षण क्षेत्रातून नाराजी व्यक्त होत असल्याने शासनाने या निर्णयाचा फेरविचार केला आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त विषयांच्या अभ्यासामध्ये कपात केल्यास शालेय विद्यार्थ्यांच्या सर्वांगिक विकासाच्या दृष्टीने शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२३-११-२०१७) :**(१) नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे लिंगनूर व नेसरी (ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर) येथील राष्ट्रीय पेयजल योजनेसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(२८) ८७०३८ (२१-०८-२०१७). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे लिंगनूर व नेसरी (ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर) येथील राष्ट्रीय पेयजल योजनेच्या नळपाणी पुरवठा योजनेसाठी निधी उपलब्ध करुन योजनेचे काम करण्याची मागणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांचेकडे स्थानिक लोकप्रतिनिधी चंदगड व नागरीकांनी माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०९-११-२०१७) :**(१) होय.

(२) मौजे लिंगनूर व नेसरी ता. गडहिंग्लज येथील राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेच्या नळ पाणी पुरवठा योजनेसाठी रु.४७,२८,२४२/- इतक्या देय रकमेपैकी एकूण रु. ३०,२३,५८३/- इतका निधी वितरीत करण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूरातील अनेक केंद्रावर विद्यार्थ्यांना चुकीची उत्तरपत्रिका देण्यात आल्याबाबत**

**(२९) ८७४०४ (२१-०८-२०१७). श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर मध्ये विद्यापीठ अनुदान आयोगातर्फे (युजीसी) अधिव्याख्याता पदावर नियुक्त होण्यासाठी “सेट” परिक्षा दिनांक १६ एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास घेण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर मधील अनेक केंद्रावर विद्यार्थ्यांना चुकीची उत्तरपत्रिका देण्यात आली होती हेही खरे आहे काय,

(३) असल्यास,याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२३-११-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) सदर परीक्षा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सेट परीक्षा विभागामार्फत घेण्यात येते, त्यामुळे सदर प्रकरणी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून चौकशी करण्यात आली आहे.

त्यामध्ये कोल्हापूर येथील काही परीक्षा केंद्रावर किरकोळ प्रमाणात ओ.एम.आर. शीटचे वाटप करताना संबंधित वर्गावरील पर्यवेक्षकांकडून मॅथेमॅटिकल सायन्सच्या विद्यार्थ्यांना मॅथेमॅटिकल सायन्सऐवजी इतर विषयाची ओ.एम.आर. शीट नजरचूकीने वाटप केली गेली. परंतु सदर चूक लक्षात आल्यानंतर तात्काळ त्यात बदल करून मॅथेमॅटिकल सायन्सच्या विद्यार्थ्यांना मॅथेमॅटिकल सायन्सची ओ.एम.आर.शीट देण्यात आली तसेच ज्या विद्यार्थ्यांची ओ.एम.आर. शीट बदलून देण्यात आली त्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून खबरदारीचा उपाय म्हणून त्या संबंधित विद्यार्थ्यांच्या ओ.एम.आर.शीट काळजीपूर्वक तपासण्यात आल्या व त्याप्रमाणे सर्व विद्यार्थ्यांचा निकाल १० ऑगस्ट, २०१७ रोजी विद्यापीठाच्या सेट विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला. दि. १६ एप्रिल, २०१७ रोजी आयोजित केलेल्या ३३ व्या सेट परीक्षेचा निकाल जाहिर केल्यानंतर कोल्हापूर केंद्रावरील एकाही विद्यार्थ्यांची या संदर्भात लेखी तक्रार आजतागायत प्राप्त झालेली नसल्याचे विद्यापीठाने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील माध्यमिक विद्यालयातील शारिरीक शिक्षण व चित्रकला या विषयांचे तास कमी करण्यात आल्याबाबत

**(३०) ८७४४१ (२३-०८-२०१७). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शैक्षणिक वर्ष सन २०१७-१८ पासुन विषयवार तासिका विभागणीत कला, क्रिडा व कार्यानुभव शिक्षकांचा २५ ते ५० टक्के कार्यभार कमी करण्याचे आदेश माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निर्गमित करण्यात आला असून उक्त आदेशानुसार माध्यमिक विद्यालयातील शारिरीक शिक्षण व चित्रकला या विषयांचे तास कमी करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आदेशानुसार इयत्ता ५ ते १० पर्यंतच्या वर्गाचे शारीरीक शिक्षण व चित्रकला विषयाच्या तासीका कमी करण्यात आल्याने अनेक शिक्षक अतिरिक्त ठरले असून सदर शिक्षकांना प्राथमिक व माध्यमिक शाळेमध्ये तात्पुरत्या ११ महिन्यांच्या करारावर नियुक्या देणेबाबत शासन विचारधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कला क्रिडा शिक्षकांना प्राथमिक व माध्यमिक शाळेमध्ये तात्पुरत्या ११ महिन्याच्या करारात शालेय स्तरावरील विषयनिहाय तास निश्चीत करण्याबाबत तसेच इयत्ता १ ली ते ८ वी करिता विषयवार तासिका विभागणी लागु करणेबाबतचे आयुक्त (शिक्षण) यांचे दि. २८ मे २०१७ रोजी निर्गमित केलेले परिपत्रक रद्द करण्यात येऊन दिलांक २९ एप्रिल, २०१७ रोजी शासन निर्णयाप्रमाणे पुर्ववतप्रमाणे कार्यवाही करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी मा.शालेय शिक्षण मंत्रीयांचेकडे माहे मे, २०१७ मध्ये तर संचालक विद्या प्राधिकरण पुणे तथा

राज्यातील शिक्षकांच्या विविध संघटनांनी माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे ही खरे काय,

(४) तसेच, उक्त आदेशाच्या निषेधार्थ हातकणंगले (जि.कोल्हापूर) तालुका शारिरीक संघ, तसेच कला व संगीत अध्यापक संघ, इचलकरंजी यांच्या वतीने प्रांत कार्यालयास तसेच नायब तहसिलदार यांना लेखी निवेदन देण्यात आले तर कमी केलेल्या तासिका पुर्ववत करण्यात याव्यात याबाबत सोलापूर जिल्हा शारीरिक शिक्षण, कला विषय बचाव व कृती समिती सोलापूर यांनी माहे, जून २०१७ मध्ये वा त्या दरम्यान मा.शालेय शिक्षण मंत्री यांना निवेदन दिले आहे हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त तासिका पुर्ववतकरणे बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२३-११-२०१७) :**(१) कार्यभार कमी करण्यात आलेला नसून, तासिका कमी करण्यात आलेल्या आहेत.

(२) नाही.

(३) व (४) होय.

(५) कला व शारिरीक शिक्षण या विषयांच्या तासिकांमध्ये अंशत: बदल करुन सुधारित परिपत्रक काढण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सांगली जिल्हयातील नळपाणीपुरवठा योजनातील कर्मचा-यांचे वेतन थकीत असल्याबाबत

**(३१) ८८७२४ (२१-०८-२०१७). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयातील कुंडल, नांद्रे-वसगडे, वाघोली, कासेगाव, जुनेखेड-नवेखेड, तुंग-बागणी या ६ प्रादेशिक नळपाणी पुरवठा योजनांतील ५५ कर्मचा-यांना गत ५ महिन्यांपासून वेतन व पेंशन न मिळाल्याने दिनांक १५ मे,२०१७ रोजी वा त्या सुमारास जिल्हा परिषदेसमोर बेमुदत धरणे आंदोलन सुरु केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कर्मचा-यांना वेतन व पेंशन न मिळण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व उक्त कर्मचा-यांना वेतन व पेंशन देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१६-११-२०१७) :**(१) व (२) सांगली जिल्हयातील कुंडल, नांद्रे-वसगडे, वाघोली, कासेगाव, जुनेखेड-नवेखेड, तुंग-बागणी या ६ प्रादेशिक नळपाणी पुरवठा योजनांतील (५३) कर्मचा-यांना वेतन व (३१) निवृत्ती वेतनधारकांना पेन्शन माहे जून, २०१७ अखेर देण्यात

आलेले आहे. माहे जुलै, २०१७ चे वेतन व निवृत्ती वेतन अदा करणे करीता तालुकास्तरावरुन पाणी पट्टी वसुली रक्कम प्राप्त होताच वेतन व निवृत्ती वेतन जिल्हा परिषदेमार्फत अदा करणेत येत आहे.

(३) पाणी पट्टीच्या दरापेक्षा योजना संचलन करण्याचा खर्च जास्त असल्याने कर्मचा-यांचे वेतन वेळेवर अदा करता येत नाही. तथापि, पाणीपट्टी वसुली, जिल्हा परिषद स्विय निधी व शासन अनुदान यामधून प्राप्त अनुदानातून जून, २०१७ अखेरचे वेतन व सेवानिवृत्ती वेतन अदा करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नांदेड जिल्हयातील वृध्द कलावंताचे मानधनाचे प्रस्ताव मंजूरीसाठी प्रलंबित असल्याबाबत**

**(३२) ८९०११ (२१-०८-२०१७). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील वृध्द कलावंताना मानधन देण्यासाठी स्थापन केलेल्या समितीने गत दोन वर्षापासून बैठकच घेतली नसून त्यामुळे येथील कलावंताचे शासनाकडे पाठविलेले मानधनाचे १२० प्रस्ताव मंजूरीसाठी प्रलंबित असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त प्रस्तावांना मंजूरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२४-११-२०१७) :**(१) हे खरे आहे.

(२) नांदेड जिल्ह्यातील वृद्ध कलावंतांना मानधन देण्यासाठी समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांनी दिनांक ३० मे, २०१७ रोजी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत एकूण ६०८ कलावंतांपैकी १२० कलावंतांचे प्रस्तावास मंजुरी देण्यात आली.

सदर बैठकीत मंजूर झालेल्या १२० कलावंतांपैकी सन २०१५-२०१६ मधील ५९ कलावंत व २०१६-२०१७ या वर्षातील २९ कलावंत अशा एकूण ८८ कलावंतांची निवड करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील वानखेडे स्टेडीयम येथे आयपीएल सामन्यादरम्यान वेष्टित वस्तूंवर (सीलबंद) अधिक दर आकारल्याबाबत**

**(३३) ८९३४४ (२१-०८-२०१७). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वानखेडे स्टेडीयम येथील आयपीएल सामन्यादरम्यान वेष्टित वस्तूंवर (सीलबंद) अधिक दर आकारल्याने वैध मापनशास्त्र विभागाने बोर्ड ऑफ कंट्रोल फॉर क्रिकेट इंडिया (बीसीसीआय) व मुंबई क्रिक्रेट असोशिएशन (एमसीए) या दोन्ही यंत्रणांना खुलासा करण्याची नोटीस पाठवली असल्याचे माहे मे २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाबाबत ताकीद देवूनही सदर ठिकाणी ग्राहकांची फसवणूक होत असल्याचे निदर्शनास आल्याने विभागाने उक्त नोटीस पाठविली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार बीसीसीआय व एमसीएवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०९-११-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) सदर प्रकरणी बीसीसीआयकडे विक्रेत्यासंबंधीचा तपशील/करारनामा मागविण्यात आला असून याबाबतची माहिती प्रलंबीत आहे. प्रलंबीत माहिती प्राप्त करण्याकरीता व पुढील कार्यवाहीस्तव पाठपुरावा करण्यात येत आहे. सदर कारवाई करण्यात आलेल्या आरोपीने गुन्हा मान्य न केल्याने खटले प्रशमन/न्यायालयीन कार्यवाहीसाठी प्रलंबीत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांना प्रथम भाषा म्हणून इंग्रजी किंवा मराठी निवड करण्याचा पॅटर्न राबविण्याबाबत

**(३४) ८९३९६ (२३-०८-२०१७). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.सुभाष साबणे (देगलूर), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.किशोर पाटील (पाचोरा), डॉ.राहूल पाटील (परभणी), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात नव्या शैक्षणिक वर्षात नववी व दहावीच्या मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांनी प्रथम भाषा म्हणून मराठी भाषा नाकारुन इंग्रजीचे प्रथम भाषा म्हणून निवड करु शकतील तसेच इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांनाही प्रथम भाषा म्हणून इंग्रजी किंवा मराठी निवडण्याचे स्वातंत्र्य असेल अशा प्रकारचा राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचा नवा पॅटर्न राबविण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त नवा पॅटर्न राबविण्यात येण्याची कारणे काय आहेत तसेच हा पॅटर्न मायबोली मराठी भाषेच्या दृष्टीने हानिकारक आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त नवा पॅटर्न मराठी भाषेच्या दृष्टीने हानिकारक असल्याने तो तातडीने रद्द करण्यात यावा अशी राज्यातील विविध स्तरातून मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२३-११-२०१७) :**(१) नाही.
(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर येथील क्रीडा संकूलाच्या कामाबाबत**

**(३५) ८९७४१ (२१-०८-२०१७). श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर येथील क्रिडा संकुलास विभागीय आयुक्त यांनी माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान भेट दिली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या भेटीदरम्यान आयुक्तांना कोणकोणत्या त्रुटी आढळून आल्या आहेत,
(३) तसेच जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनीही माहे डिसेंबर, २०१६ मध्ये येथील खेळांची मैदाने वापरता येतील अशा प्रकारे कार्यवाही करण्याचे आदेश दिले असतानांही अद्यापही याबाबत कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ,
(५) तसेच प्रत्यक्षात या क्रीडा संकुलातील खेळांची मैदाने केव्हापर्यंत वापरात येऊ शकतील नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (२७-११-२०१७) :**(१) व (२) होय, हे खरे आहे. सदर भेटी दरम्यान परिसराची स्वच्छता, मुख्य प्रवेशद्वार बांधकाम करणे, सुविधांचा अधिकाधिक वापर करणे, शुटींग रेंज सुरु करणे, पार्किंगची जागा विकसित करणे, जलतरण व डायव्हिंग तलावाचे काम सुरु करणे इत्यादी कामे करण्याचे ठरविण्यात आले.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) कोल्हापूर येथील क्रीडा संकुलात जिल्हास्तरीय, विभागीय क्रीडा स्पर्धा, कोल्हापूर महानगरपालिकास्तरीय शालेय मैदानी क्रीडा स्पर्धा व जिल्हास्तर बास्केटबॉल संघटनेमार्फत क्रीडा स्पर्धांचे तसेच खाजगी शैक्षणिक संस्थेमार्फत वार्षिक क्रीडा महोत्सव इत्यादी स्पर्धा संपन्न झाल्या. क्रीडा संकुलातील सुविधा सध्या वापरण्यास योग्य असून सध्या खेळाडूंकडून दैनंदिन वापर सुरु आहे.

---

**नागपूर (जि.नागपूर) शहरातील अंबाझरी तलाव रसायनमिश्रित पाण्यामुळे दुषित झाल्याबाबत**

**(३६) ८९८६० (२१-०८-२०१७). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर (जि.नागपूर) शहरातील अंबाझरी तलावात हिंगणा व वाडी परिसरातील उदयोगांमधून निघणारे रसायनयुक्त पाणी व परिसरातील वस्त्यांतील सांडपाणी नागनदीच्या प्रवाहातून आंबाझरी तलावात मिश्रीत होत असल्याने तलावातील पाणी प्रदूषित होवून जैवविविधता धोक्यात आली असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निर्दशनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिका-यांचे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली तसेच उक्त तलावाच्या शुध्दीकरणाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (१४-११-२०१७) :**(१) हे अंशत: खरे आहे

माहे एप्रिल, २०१७ मध्ये मा.पालकमंत्री, जि.नागपूर यांच्याकडून हिंगणा एमआयडीसीची वॉटर कॅनवर तहान/ अंबाझरी तलावाच्या पंपातून येणारे पाणी दुषित या आशयाची तक्रार प्राप्त झाली होती.

तक्रारीच्या अनुषंगाने मंडळाकडून दिनांक ११.४.२०१७ रोजी अंबाझरी तलावाच्या परिसराची पाहणी करण्यात आली. पाहणी दरम्यान एमआयडीसी हिंगणा औद्योगिक वसाहतीमधील सी सेक्टर परिसरातून उद्योगाचे सांडपाणी अंबाझरी तलावामध्ये जात असल्याचे आढळून आले नाही, तथापि, दिनांक २८.६.२०१७ च्या भेटी दरम्यान वाडी नगरपरिषद व परिसर येथील घरगुती सांडपाणी विनाप्रक्रिया नाल्याव्दारे नागनदीमध्ये मिसळल्याचे आढळले. ही नागनदी पुढे अंबाझरी तलावास मिळते.

(२) व (३) हे खरे नाही.

वाडी नगर परिषदेने घरगुती सांडपाण्यावर कोणतीही घरगुती सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणा बसवली नसल्यामुळे वाडी नगर परिषदेने जल (प्र व प्र नि) कायदा, १९७४ चे उल्लंघन केले असल्यामुळे सदर नगर परिषदेवर म. प्र. नि. मंडळाव्दारे खटला क्रमांक ५६१६/२०१६ दाखल करण्यात आलेला आहे व सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राष्ट्र संत तुकडोजी महाराज नागपूर, विद्यापीठ अंतर्गत विधी विद्यापीठाच्या वस्तीगृहात प्रवेष पात्र विद्यार्थ्यां व्यतिरिक्त बाहेरील विद्यार्थी राहत असल्याबाबत**

**(३७) ८९९१० (२१-०८-२०१७). श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठा अंतर्गत असलेल्या विधी विद्यापीठाच्या वस्तीगृहात प्रवेश पात्र विद्यार्थ्यां व्यतिरिक्त बाहेरील विद्यार्थी राहत असल्याचे दिनांक ९ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली, वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२३-११-२०१७) :**(१) हे खरे नाही.

विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांव्यतिरिक्त बाहेरील विद्यार्थी वसतिगृहात राहात असल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही

(३) प्रश्न उद्भवत नाही

---

**मुंबई विद्यापीठाच्या परिक्षा विभागात परिक्षा नियंत्रकाच्या नावाने छपाई करुन ठेवलेल्या गुणपत्रिका पडून असल्याबाबत**

**(३८) ९००१९ (२१-०८-२०१७). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात लागू करण्यात आलेल्या नवीन विद्यापीठ कायद्यानूसार परिक्षा नियंत्रकाचे पद परिक्षा आणि मूल्यांकन मंडळाचे संचालक म्हणून ओळखले जाणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई विद्यापीठाच्या परिक्षा विभागात पुर्वीच परिक्षा नियंत्रकाच्या नावाने छपाई करुन ठेवलेल्या लाखांहून अधिक गुणपत्रिका पडून असल्याचे दिनांक १८ एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त पडून असलेल्या जुन्या गुणपत्रिका हया गुणपत्रिकेची दुसरी प्रत (डुप्लिकेट) मागणा-यांना व फेरपरिक्षा (केटी) उत्तीर्ण होणा-या विद्यार्थ्यांच्या हाती देण्याचे संचालकांनी ठरविले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (२३-११-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ ची अंमलबजावणी दि.१ मार्च, २०१७ पासून सुरु झाली आहे. व्दितीय सत्र २०१६ च्या सर्व परीक्षांचे निकाल मार्च, २०१७ पूर्वी जाहीर झालेले असल्याने सर्व गुणपत्रिका परीक्षा नियंत्रकांच्या नांवाने संबंधित महाविद्यालयातून विद्यार्थ्यांना देण्यात आल्या आहेत. ज्या विद्यार्थ्यांचे निकाल दि. १ मार्च, २०१७ पूर्वी लागले आहेत अशाच विद्यार्थ्यांची मूळ तसेच दुय्यम गुणपत्रके व उत्तीर्ण प्रमाणपत्रे परीक्षा नियंत्रक या नावाने दिल्याचे व देण्यात येणार असल्याचे विद्यापीठाने कळविले आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शालेय शिक्षण विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(३९) ९०३१७ (२३-०८-२०१७). श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या शालेय शिक्षण विभागाच्या कारभारासाठी प्राथमिक, माध्यमिक, व उच्च माध्यमिक, राज्य शिक्षण मंडळ, बालभारती, विद्या प्राधिकरण, अल्पसंख्यांक व प्रौढ शिक्षण, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद असे स्वतंत्र विभाग करण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विभागांना पूर्णवेळ प्रमुख नसून इतर विभागांच्या अधिकाऱ्यांवरच अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच प्राथमिक शिक्षण विभागात गट क आणि ड वर्गाची जवळपास निम्मी पदे रिक्त आहेत हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने शिक्षण विभागात दीर्घकाळापासून पदोन्नत्या आणि भरती प्रक्रिया न केल्यामुळे रिक्त असलेल्या पदांवर अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२१-११-२०१७) :**(१) हे खरे आहे
(२) शिक्षण संचालक संवर्गातील ७ पदांपैकी ६ पदे भरलेली असून १ पद रिक्त आहे.
(३)प्राथमिक शिक्षण विभागातील गट “क” च्या ६६ मंजूर पदांपैकी ३९ व गट “ड” च्या मंजूर १५ पदांपैकी ५ पदे रिक्त आहेत.
(४) व (५) वित्त विभागाच्या दिनांक २.६.२०१५ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार जेवढी रिक्त पदे भरणे शक्य आहे तेवढी रिक्त पदे भरण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार आयुक्त, शिक्षण यांच्याकडून सरळसेवा भरतीची प्रकिया सुरु आहे.

---

**राज्यात महाविद्यालय विकास समिती स्थापन करण्याबाबत**

**(४०) ९०६२२ (२१-०८-२०१७). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महाविद्यांलयाचे धोरणात्मक निर्णय, महत्वाच्या प्रकरणांवरील कार्यवाही करण्यासाठी प्रत्येक महाविद्यालयात पूर्वीच्या स्थानिक समितीऐवजी (विकास समिती) स्थापित करण्याची नव्या विद्यापीठ कायद्यानुसार तरतूद करण्यात आल्याचे दिनाक २५ एप्रिल,२०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या महाविदयालयांचे कामकाज सुरळीत चालण्याकरिता वरील समितीची स्थापना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२३-११-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) उच्च शिक्षण संचालनालयाने दि. २ मार्च, २०१७ च्या पत्रान्वये सर्व संबंधितांना महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ९७ मधील तरतुदीनुसार महाविद्यालय विकास समिती स्थापन करण्याच्या सूचना दिल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आळंदी येथील (जि.पुणे) इंद्रायणी नदीत मैलामिश्रीत तसेच रसायनमिश्रीत पाणी सोडण्यात येत असल्याबाबत

**(४१) ९१११८ (२१-०८-२०१७). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आळंदी (जि.पुणे) येथील इंद्रायणी नदीत मैलामिश्रीत तसेच रसायनमिश्रीत पाणी थेट सोडण्यात येत असल्यामुळे यंदाही वारक-यांना प्रदूषित पाण्याच्या समस्येला सामोरे जावे लागणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त ठिकाणच्या इंद्रायणी नदीचे प्रदूषण दूर करण्याकरिता कोणत्या विशेष उपाययोजना आखल्या आहेत व या कामाची सद्यःस्थिती काय आहे,
(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (१८-११-२०१७) :**(१) हे खरे नाही. तथापि, इंद्रायणी नदीमध्ये घरगुती सांडपाण्याचा विसर्ग होत असल्यामुळे बी.ओ.डी. चे प्रमाण काही अंशी वाढल्याचे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत केलेल्या पृथ:करण अहवालात दिसून येते.
(२) इंद्रायणी नदीचे प्रदूषण दूर करण्याकरिता खालीलप्रमाणे उपाययोजना केल्या जात आहेत :-
• केंद्र शासनाच्या JnNURM योजनेतंर्गत पुणे महानगरपालिकेस भामा-आसखेड उध्दभवावरुन पाणी पुरवठा योजना मंजूर करण्यात आली असून याच योजनेत कुरळी येथून आळंदी नगरपरिषदेस पाणी पुरवठा करण्यासंदर्भात तत्वत: मंजूरी देण्यात आली आहे.
• आळंदी तिर्थक्षेत्र विकास आराखडा तयार केला असून त्यामध्ये भुयार गटारी योजना तसेच घरगुती सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा उभारणे इ. कामांसाठी निधी मंजूर करण्यात आला आहे. सद्यस्थितीत आळंदी नगरपरिषदेकडून भुयार गटार योजनेचे काम सुरु करण्यात आले आहे.

• महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून जल प्रदूषण (प्रतिबंध आणि नियंत्रण) कायदा, १९७४ अंतर्गत देहू येथील लष्करी छावणीला कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका, लोणावळा, तळेगांव, दाभाडे, आळंदी नगरपरिषद यांच्यावर न्यायालयात खटले दाखल केलेले असून सदर प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्य मंडळ व विभागीय मंडळावर अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्याबाबत**

**(४२) ९१७६४ (२३-०८-२०१७). श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य व उच्च शिक्षण मंडळ अंतर्गत सर्व विभागीय मंडळांवर अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास राज्यातील ९ विभागीय मंडळांवर मुख्याध्यापक, प्राचार्य, माध्यमिक शिक्षक, उच्च माध्यमिक शिक्षक, माध्यमिक व उच्च माध्यमिक महाविद्यालयातील व्यवस्थापनाचा प्रतिनिधी व शिक्षण तज्ञ इ. सदस्यांची पदे भरली जातात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील ९ विभागीय मंडळाअंतर्गत असलेल्या एकूण १४४ अशासकीय सदस्यांपैकी एकाही सदस्याची नियुक्ती करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, महाराष्ट्र राज्य व उच्च शिक्षण मंडळातील सर्व विभागांवर अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच राज्यमंडळावरील सदस्यांची संवर्गनिहाय रिक्त पदे भरण्यात आली आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२९-११-२०१७) :**(१), (२) व (३) हे खरे आहे
(४) राज्यमंडळ व विभागीय मंडळावर अशासकीय सदस्यांची २०१४ मध्ये केलेली नियुक्ती दि.०५.०३.२०१५ च्या राजपत्रान्वये रद्द करण्यात आलेली आहे. तथापि, नियुक्ती रद्द करण्याच्या आदेशाविरुध्द मा.मुंबई उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते. नवीन अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कळंब (ता.कळंब, जि.यवतमाळ) येथे क्रीडा संकुलासाठी देण्यात आलेला निधी अखर्चित राहिल्याबाबत**

**(४३) ९२५३८ (२१-०८-२०१७). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळंब (ता.कळंब, जि.यवतमाळ) येथे सन २०१२-१३ मध्ये क्रीडा संकुलाच्या बांधकामाकरिता शासना कडुन निधी प्राप्त झाला असल्याचे दिनांक ५ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निधी प्राप्त असूनही क्रीडा सकंलाचे बांधकाम करण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यानुसार संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२७-११-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) कळंब तालुका क्रीडा संकुलासाठी सन २००७-०८ मध्ये ग्रामपंचायत कळंब यांच्या ताब्यातील जागा प्राप्त झाली होती. त्यानुसार ग्रामपंचायत कळंब व जिल्हा क्रीडा अधिकारी यवतमाळ यांच्यात करारनामा करण्यात आला होता. परंतु महसूल विभागाकडून सदरची जागा क्रीडा विभागाकडे फेरफार करुन क्रीडा विभागाच्या नांवे करण्याची कार्यवाही करत असतांना सदर जागा हि खाजगी मालकीची असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे सदर जागेवरील बांधकाम थांबविण्यात आले आहे.

सदर बाब तालुका क्रीडा संकुल समितीच्या दिनांक १८.०९.२०१७ रोजीच्या बैठकीमध्ये मा.आमदार तथा अध्यक्ष यांच्या निदर्शनात आणून समितीच्या ठरावानुसार तहसिलदार, कळंब यांचे अध्यतेखाली चौकशी समिती गठीत केली असून चौकशीची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह अनुदान योजनेतील विद्यार्थ्यांना लाभ मिळण्याबाबत**

**(४४) ९२९६५ (२३-०८-२०१७). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शालेय विद्यार्थ्यांसाठी सुरू करण्यात आलेल्या अपघात सानुग्रह योजनेतील २६९ विद्यार्थ्यांना माहे मार्च, २०१७ अखेर अुनदान मिळाले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिक्षण संचालनालयाने सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरीता १० कोटी रूपयांची मागणी केली असता शासनाने ८ कोटी रूपये निधी दिला हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सन २०१४-१५ व २०१५-१६ या दोन वर्षात या योजनेसाठी कमी अनुदान देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह अनुदान योजनेतील सर्व विद्यार्थ्यांना लाभ मिळण्या बाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१०-११-२०१७) :**(१) अंशत: खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) सन २०१५-१६या वर्षात या योजनेसाठी रक्कम रुपये ४,२०,०० हजारइतके अनुदान देण्यात आले होते.

सन २०१४-१५ या वर्षात या योजनेसाठी रक्कम रुपये ४,२०,०० हजार इतके अनुदान देण्यात आले होते.
(४) शिक्षण संचालक(प्राथमिक), पुणे यांच्याकडून प्राप्त होणा-या, राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह अनुदान योजनेसाठीच्या निधी वितरणाच्या प्रस्तावानुसार, या योजनेतील सर्व पात्र लाभार्थ्यांना अनुदान वितरीत करण्याबाबत शासन स्तरावरून आदेश निर्गमित करण्यात येतात.

शिक्षण संचालक(प्राथमिक), पुणे यांच्या प्रस्तावास अनुसरून, विभागाच्या दि.१२.७.२०१७ च्या शासन निर्णयान्वये सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह अनुदान योजनेसाठी अर्थसंकल्पीत करण्यात आलेल्या निधीमधून एकूण रू.४,६६,८८,०००/- (अक्षरी रुपये चार कोटी सहासष्ठ लाख अठ्ठयाऐंशी हजार फक्त) इतका निधी वितरीत करण्यास मान्यता देण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जिल्हा परिषद शाळांना (ता.जिवती, जि.चंद्रपूर) पोषण आहार ठेवण्यासाठी कोठारे खरेदी करण्याबाबत

**(४५) ९३०९५ (२३-०८-२०१७). ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिल्हा परिषद शाळांना (ता.जिवती जि.चंद्रपूर) पोषण आहार ठेवण्याकरिता कोठारे खरेदीकरण्यासाठी अनुदान देण्यात आले असून सदर अनुदानाची उचल करूनही कोठारे खरेदी करण्यात आली नसल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२)असल्यास, अनुदानाची रक्कम घेवूनही कोठारे खरेदी न करण्याचे कारणे काय आहेत,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२३-११-२०१७) :**(१) हे खरे नाही.
(२) व (३) कोठया पुरविण्यासंदर्भात MSSIDC चंद्रपूर आणि औद्योगिक विकास प्रशिक्षण केंद्र, जिवती, जि.चंद्रपूर यांनी नकार दिल्याने शाळा स्तरावर निधी वितरीत केला असून पात्र शाळांनी सदर निधीद्वारे कोठया खरेदी केल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**फणसकोंड (ता.पोलादपूर, जि.रायगड) येथे जाकमाता येथील तलावाची भिंत कोसळल्याने नळपाणी योजना बंद पडली असल्याबाबत**

**(४६) ९३२६८ (२१-०८-२०१७). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) फणसकोंड (ता.पोलादपूर, जि.रायगड) येथे जाकमाता येथील तलावाची भिंत पावसात कोसळल्याने तलावातील पाणी गढूळ झाले असून पडलेल्या भिंतीमुळे नळपाणी योजनादेखील बंद पडली असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त नळ पाणी योजना बंद पडल्यामुळे ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त नळपाणी योजना सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१७-११-२०१७) :**(१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) याबाबत जिल्हा परिषदेमार्फत चौकशी करण्यात आली. माहे जून, २०१७ च्या पहिल्या आठवड्यात झालेल्या पावसामुळे तलावाची १२ मीटर लांबीची संरक्षण भिंत कोसळली होती. भिंत कोसळल्यामुळे पाणी गढूळ झाले आहे अशी बाब आढळून आली नाही. सदर नळ पाणी पुरवठा योजनेद्वारे पाणी पुरवठा सुरळीत सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक रोडच्या पूर्व भागातील पलवे गावात पारले कंपनी परिसरातील वीटभट्ट्यांमुळे होणारे प्रदूषण**

**(४७) ९३९५६ (२१-०८-२०१७). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक (जि.नाशिक) रोडच्या पूर्व भागातील पलवे गावात पारले कंपनी परिसरातील वीटभट्ट्यांची संख्या वाढल्यामुळे प्रदूषणात मोठया प्रमाणात वाढ होत असून परिसरातील शेती व्यवसाय पूर्णतः धोक्यात आल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गावातील नागरिकांनी सदर वीट वीटभट्ट्या बंद करण्याबाबत प्रदूषण नियंत्रण मंडळ व जिल्हाधिकारी , नाशिक यांना वारंवार निवदने दिली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त वीट भट्ट्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (०९-११-२०१७) :**(१) व (२) हे खरे नाही.
(३) तथापि, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी दि.३१/०७/२०१७ रोजी पळसे गावात पारले कंपनी परिसरास भेट दिली असता सदरील परिसरात १४ पारंपारीक पध्दतीच्या वीटभटया उभारलेल्या आढळून आल्या परंतु , पावसामुळे सदरील वीटभटया बंद होत्या.

या विटभटटीधारकांना पर्यावरण (संरक्षण) कायदा, १९८६ अंतर्गत वने व पर्यावरण विभाग, भारत सरकार यांनी पारीत केलेल्या दि. २२ जुलै २००९ व १८ नोव्हेंबर २००९ च्या राष्ट्रीय हवा गुणवत्ता मानकांचे व त्यामध्ये नमूद केलेल्या अटींचे पालन करण्याचे व म.प्र.नि.मंडळाच्या संमती पत्रासाठी प्रदूषण नियंत्रण सयंत्रणेसह www.mpcb.gov.in या संकेत स्थळावर online अर्ज सत्वर सादर करण्यासाठी व त्याअनुषंगाने मंडळास तलाठी, स.जा.पळसे, ता.जि.नाशिक यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीस अनुसरुन समजपत्र बजावण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अमरावती (जि.अमरावती) शहरात अवैधरित्या प्रतिबंधित गुटख्याचा कारखाना असल्याबाबत**

**(४८) ९४०९७ (२१-०८-२०१७). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती (जि.अमरावती) शहरातील एका बांधकाम व्यावसायिकाने अन्न व औषधी प्रशासनाचे अधिकारी, महापालिकेचे आरोग्य अधिकारी आणि पोलीस, अमरावती यांच्या संगनमताने सातूर्णा भागात प्रतिबंधित गुटख्याचा कारखाना अवैधरित्या सुरू केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कारखान्यातून तयार केलेला माल बडनेरा परिसरातील बेलोरा जवळील गोदामामध्ये ठेऊन नंतर विदर्भातील यवतमाळ, बुलडाणा, अकोला, वाशिम या जिल्हयामध्ये अवैधरित्या विक्री होत असल्याची माहिती दिनांक २९ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय
(३)असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१५-११-२०१७) :**(१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आंबडवे (जि.रत्नागिरी) येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर कॉलेजचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(४९) ९४९४८ (२५-०९-२०१७). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आंबडवे (जि.रत्नागिरी) येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर कॉलेजसाठी स्थानिक ग्रामस्थांनी १३ एकर जमीन उपलब्ध करून दिली असून सर्व सोई सुविधांनी युक्त अशा कॉलेजच्या इमारतीच्या बांधकामाकरिता शासनाने १२ कोटी रुपये मंजूर केले असून सदर इमारतीचे भूमिपूजन मा.उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री यांच्या हस्ते दिनांक २८ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कॉलेजचे बांधकाम माहे ऑगस्ट, २०१६ पर्यंत पुर्ण होणे अपेक्षित असतानाही उक्त बांधकाम अद्यापही पूर्ण झालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने उक्त कॉलेजचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०८-११-२०१७) :**(१) होय. तथापि, आंबडवे (ता.जि.रत्नागिरी) येथील आदर्श महाविद्यालय सुरु करण्यासाठी एकूण ८ कोटी अनुदान मंजुर असून त्यापैकी केंद्र शासनाचा वाटा रु.२.६७ कोटी व राज्य शासनाचा वाटा रु.५.३३ कोटी इतका आहे.
(२) व (३) आंबडवे (ता.जि.रत्नागिरी) येथील आदर्श महाविद्यालयाचे बांधकाम दोन टप्प्यात घेण्यात आले असून पहिल्या टप्प्यातील कामे पुर्ण झाले आहे. दुसऱ्या टप्प्यातील बांधकाम प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे विलासराव देशमुख आदेशन केंद्र सुरु करण्याबाबत**

**(५०) ९४९५१ (२५-०९-२०१७). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे विलासराव देशमुख आदेशन केंद्र स्थापित करण्याबाबत शासनाने मंजुरी दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर आदेशन केंद्र सुरु करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी,लातूर ग्रामीण यांनी माहे सप्टेंबर २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मा.कुलगुरू यांना निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर आदेशन केंद्र स्थापण्याबाबत राज्य शासनाने किती निधीची मंजुरी दिली आहे व किती निधीची तरतूद केली आहे,
(४) तसेच सदर आदेशन केंद्र सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,त्याची सद्यस्थिती काय आहे,
(५) असल्यास, सदर आदेशन केंद्र स्थापित करण्याबाबत शासनास किती कालावधी लागेल , नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०९-११-२०१७) :**(१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) महाराष्ट्रातील विविध अकृषि विद्यापिठाकडून अध्यासन निर्माण करण्याबाबत वाढती मागणी विचारात घेऊन अध्यासनासंदर्भात निश्चित धोरण तयार करण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे. यासंदर्भात निर्णय झाल्यावर अध्यासन निर्मीतीबाबत विचार करणे अपेक्षित आहे. त्यामुळे, अध्यासन निर्मितीबाबत धोरण निश्चित झाल्यावरच मा.लोकप्रतिनिधींनी अध्यासन सुरु करण्याबाबत केलेल्या शिफारशींसंदर्भात, योग्य ती कार्यवाही करणे शक्य आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.